# <u>प्रेसनोट दिनांक १८/०७/२०२२</u>
# <u>दरोडा विरोधी पथक व गुन्हे शाखा युनिट ५ ची संयुक्त कामगिरी</u>

## एटीएम फोडणारी टोळी २४ तासाच्या आतमध्ये अटक करून, त्यांचेकडुन एटीएम चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणुन, <u>५,५०,०००/- रू ची रोख रक्कम व चारचाकी वाहन हस्तगत.</u>



| | | |
|---|---|---|
| | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, | |
| | दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय | |
| | ई - मेल :- piantideco.pcpc-mh@gov.in | |
| | | |



दिनांक १४/०७/२०२२ रोजी रात्रीच्या वेळेस मराठा क्रांती चौक, तळेगाव दाभाडे येथील एचडीएफसी बँकेचे एटीएम मशिनमधील पैसे हे कोणीतरी अज्ञात चोरटयाने एटीएम मशिनचा पासवर्ड प्राप्त करून, त्यामधील ५,८२,५००/- रू रोख रक्कम चोरी केली व दिशाभुल करण्याच्या हेतुने, एटीएम मशिन ज्वलनशिल पदार्थाचा वापर करून नष्ट करण्याचा प्रयत्न केला याबाबत **तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. ३३७/२०२२ भा.द.वि. कलम ४५७, ३८०, ४२७, ४३६, २०१, ३४** अन्वये दाखल असुन सदर गुन्हयाचा दरोडा विरोधी पथक व गुन्हे शाखा युनिट ५ समांतर तपास करीत असताना वपोनि इंगवले यांनी पथकासह गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन गुन्हयाबाबत सविस्तर माहिती घेतली व त्या प्रमाणे दोन्ही पथकास मार्गदर्शन व सुचना देवुन एटीएम मशीन मध्ये पैश्याची भरणा करणारी कंपनी **सिक्युअर व्हॅल्यु इंडिया लि. कंपनीतील** कामगार यांच्याकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी करणेबाबत आदेशीत केले. त्याप्रमाणे सदर कंपनीतील पैसे भरणारा किरण महादे व पैसे भरणाऱ्या गाडीवर ड्रायव्हर म्हणुन काम करणारा योगेश वाळुंज यांच्याकडे केलेल्या चौकशीत असंग्धिता आढळुन आल्याने, त्यांचेवरील संशय बळावला.

संशयीत इसम नामे १) **किरण रविद्र महादे**, वय २७ वर्षे, रा. संगमवाडी, खडकी, पुणे २) **योगेश रामदास वाळुंज**, वय २९ वर्षे, आळंदी, पुणे. यांना दरोडा विरोधी पथक कार्यालय, येथे आणुन त्यांच्याकडे सखोल व बारकाईने चौकशी करता, त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे इतर साथीदारांसह केल्याची कबुली दिल्याने, लागलीच दरोडा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी दाखल गुन्हयातील आरोपी नामे ३) **बाबासाहेब भोमाजी वाळुंज**, वय ३१ वर्षे, रा. ता.पारनेर, जि.अहमदनगर ४) **मुंजाजी मारोतराव चंदेल**, वय ३२ वर्षे, मेदनकरवाडी बालाजीनगर चाकण पुणे ५) **अशोक गजानन पोतदार** वय ३५ वर्षे, रा. परांडे कॉलनी, दिघी पुणे ६) **भगवान अशोक थोरात,** वय २१ वर्षे, रा. गव्हाणे वस्ती, भोसरी पुणे यांना चाकण, पारनेर, अहमदनगर, आळंदी इत्यादी ठिकाणांहुन ताब्यात घेवुन, त्यांच्याकडे एकत्रीत चौकशी करता, त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे इतर दोन **पाहिजे आरोपी साथीदार** यांचेसह केल्याचे कबूली दिल्याने, त्यांना ताब्यात घेवुन, **तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३३७/२०२२ भा.द.वि. कलम ३३७/२०२२ भा.द.वि.कलम ४५७, ३८०, ४२७, ४३६, २०१, ३४** या गुन्हयाचे कामी तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे येथे हजर केले.

आरोपी **किरण रविद्र महादे, योगेश रामदास वाळुंज, अशोक गजानन पोतदार, भगवान अशोक थोरात** हे **सिक्युअर व्हॅल्यु इंडिया लि. कंपनी** तर्फे वेगवेगळया बँकेच्या एटीएम

मशिन मध्ये पैसे भरण्याचे **(एटीएम ऑपरेटर)** काम करतात, त्यापैकी **योगेश वाळुंज** हा पैसे भरणाऱ्या वाहनावर **ड्रायव्हर म्हणुन काम करतो**. आरोपी किरण महादे व योगेश वाळुंज यांनी सुमारे दोन दिवसापुर्वी एटीएम मशीनमध्ये पैसे भरल्यानंतर मशीनचे लॉक ओपन ठेवुन, रात्रीच्या वेळी सदर एटीएम मशीन मधील रोख रक्कम चोरी करण्याचा कट रचला आणि त्या नुसार योगेश वाळुंज याने कंपनीमध्ये काम करणारे मित्र व त्याचे गावाकडील मित्र असे बोलावून त्यांना कटामध्ये सामील करून घेवुन, त्यांनी कट रचल्याप्रमाणे दिनांक १४/०७/२०२२ रोजी रात्रीच्या वेळी मराठा क्रांती चौक, तळेगाव दाभाडे येथील एचडीएफसी बँकेचे एटीएम मशिनमधील पैसे चोरी करून, एटीएम मशीनवर डिझेल टाकुन आग लावुन मशीन जळाल्याचा बनाव केला असे तपासात निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपींकडुन गुन्हयामध्ये चोरीस गेलेल्या **रोख रकमेपैकी २,००,०००/- रुपये रोख व गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेली किं.रु. ३,५०,०००/- रु. किं ची स्विफ्ट डिझायर कार असा एकुण ५,५०,०००/- रुपये** किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

वर नमुद आरोपींपैकी आरोपी नामे **योगेश वाळुंज व बाळासाहेब वाळुंज** यांचेकडें केलेल्या चौकशी मध्ये त्यांनी सुमारे एक वर्षापुर्वी आळेफाटा पोलीस स्टेशन चे हददीमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र चे ए टी एम मशीन फोडण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत **आळेफाटा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३८७/२०२१ भादविक ४५७, ३८०, ५११, ३४** अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री. पद्माकर घनवट, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे - २, डॉ. प्रशांत अमृतकर, यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले, सपोनि सिध्देश्वर कैलासे, पोलीस उप निरीक्षक श्री. मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार गणेश सावंत, सुमित देवकर, समीर रासकर, विनोद वीर, अमर कदम, गणेश हिंगे, उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, प्रविण कांबळे, राहुल खारगे, राजेंद्र शिंदे, आशिष बनकर, सागर शेडगे, गणेश कोकणे, राजेश कौशल्ये, औदुंबर रोंगे, चिंतामण सुपे, प्रविण माने, गुन्हे शाखा, युनिट ५ कडील दत्तात्रय बनसोडे, शामसुदंर गुट्टे, धनंजय भोसले, दयानंद खेडकर, तांत्रिक विश्लेषन विभागाकडील नागेश माळी, राजेंद्र शेटे यांचे पथकाने केली आहे.

**(डॉ. प्रशांत अमृतकर)**
**सहा पोलीस आयुक्त (गुन्हे-२)**
**पिंपरी चिंचवड**